International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# वर्तमानावर रोखठोक भाष्य करणारी कवी लोकनाथ यशवंत यांची कविता

**अभिजीत झाडे**

संशोधन केंद्र:- शि. प्र. मं. चे तात्यासाहेब, महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली ता. चिखली, जि.बुलडाणा (महाराष्ट्र).

लोकनाथ यशवंत यांनी कवितेतून मांडलेल्या जागतिकीकरणाचा विचार करताना, त्यांनी जे सामाजिक चिंतन प्रस्तुत केले, ते भारताच्या जागतिकीकरणासाठी एक मौलिक चिंतनाचा पाथेय विषय आहे. स्वातंत्र्य मिळाले हे जेवढे महत्त्वाचे होते तेवढेच समाजसुधारणा कार्यही महत्त्वाचे आहे. ही अजुनही कवी लोकनाथ यशवंतची धारणा आहे. त्यांच्या कवितेतून सामाजिक क्रांतीच्या वस्तुपाठाच्या कविता अधोरेखित होतात. ही भूमिका आपण जेव्हा तपशिलात जाऊन विचार करतो तेव्हा तिचे पैलू आपल्या लक्षात येते. राजकारण हे तलवारीसारखे असल्यास समाजकारण हे ढालीसारखे झाले पाहिजे ही त्यांची आग्रही भूमिका आहे. वयाच्या 24 व्या वर्षी लोकनाथांनी सामाजिक शांत वाटणाऱ्या दु:खावर कविता लिहिली. काहींच्या मते लोकनाथ हे मन:स्थितीने नव्हे तर परिस्थितीने कवी झाले. कारण असे नसते तर कवितेतून सामाजिकता, समाजसुधारणेसाठी होत असलेला प्रयत्न दिसला नसता.

त्यांच्या **कवितेचा दुसरा पैलु** हा की, आपल्या समकालीन आणि आपल्या आधी होऊन गेलेल्या सामाजिक समाजसुधारकांविषयी त्यांच्या कवितेतून कृतज्ञतेची भावना व्यक्त होते. फुले, शाहू, आंबेडकर या सर्वाविषयी लोकनाथ नेहमी कृतज्ञतेची भावना बाळगतात. कारण त्यांच्या दृष्टीने फुले, बाबासाहेब जेवढे समाजसुधारक होते तेवढेच क्रांतिकारकही होते.

त्यांच्या **कवितेचा तिसरा पैलु** हा की, समाजसुधारणा ह्या येथील बहुजन समाज बलशाही व्हावा म्हणून शीघ्रातिशीघ्र साकार केल्या पाहिजे ही त्यांची ठाम भूमिका आहे. सामाजिक विषमता मोडून काढण्यासाठी लोकनाथ जोरदार प्रयत्न कवितेच्या माध्यमातून करतात.

तुला पुन्हा शेवटचे सांगतो-
संपलेत दिवस धर्माचे.
आता तरी गर्भाशयाला जप,
तिथे अंकुरतोय नवा माणूस.
धर्माच्या पलीकडला संपूर्णसा.

दलित समाजातील जातिभेदास तिलांजली देऊन अखिल दलित समाज एका विचारपिठावर आणण्यासाठी ते विविध प्रयत्न करतात, झोपडपट्टीतील वस्त्यांना भेट देणे, त्यांची दु:खे जाणून घेणे, त्यांच्यातील न्युनगंड दूर करणे हा प्रयत्न कवी लोकनाथ करतात. देशाला जगात मानाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी अंतर्गत भेदांनी पोखरलेल्या समाजास जागृत केले पाहिजे. एक देश, एक आशा,एक जाती, एक जीव, एक भाषा या सुत्रांचा लोकनाथ अवलंब करतात.

मी भीतच नाही
पडतो संकटावर जांबाजपणे तुटून
सात्विक चेहऱ्यावर पाणीही आहे.
हिम्मत तर कुटून कुटून भरली आहे.
मी परिपूर्ण आहे
संपूर्ण आहे.
मात्र, मैदानावर आलो की, जातच येते आडवी.

लढा लढायचा असला तर सर्व अनाथ, शोषण, गुलामगिरीच्या श्रृंखला तुटून पडल्या पाहिजेत. याचे दुष्परिणाम समाजाच्या एकात्मतेत व देशाच्या प्रगतीत खीळ घालत आहेत. यावरून लोकनाथांचे सर्वव्यापी द्रष्टेपण सिध्द होते.

कवी लोकनाथ पुढे कवितेतून अधोरेखित करतात की, पुढे समतेच्या गुढी निर्माण झाल्या नाहीत. परिणामत: येथील उच्च-नीचता, गुलामगिरी, शोषण, आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता दुर्देवाने कायम राहिली. पुढे या विकृतीवर सातत्याने घाव घालण्याची व समाजात न्याय व माणुसकी निर्माण करण्याची अति आवश्यकता होती. अर्थात हे सर्व कार्य 19 व्या शतकात समाजसुधारकांनी केलेच परंतु या विकृती अधिक गतीने, वेगाने संपविण्याची जी गरज होती ती गरज भारताच्या संविधानाने पूर्ण केली. United Nations Development Programme (UNDP) ने मनुष्याचा विकास म्हणजे स्वातंत्र्याचा विस्तार अशी व्याख्या केली आहे. परंतु कवी लोकनाथ यशवंत यांनी ही व्याख्या 25 वर्षापूर्वी डोळ्यासमोर ठेवलेली आपणास आढळते. मनुष्याच्या अंगभूत मुल्यास साद घालत स्वातंत्र्याचा रचनात्मक आनंद काय असू शकतो, याची अनुभूती देण्याचा प्रामाणिक प्रयास त्यांच्या कवितेतून आढळतो. हा त्यांच्या कवितासंग्रहाचा पाचवा पैलू होय.

राईट बंधूच्या आईने जन्म घ्यावा हजार वेळा
मार्कोनीच्या आईने जन्मावे अनेकदा
मायकल फॅरडेच्या आईने जन्म घ्यावा अगणित वेळा
वांरवार जन्म घ्यावा एडिसनच्या आईने
आणि हे सुंदर जग आणखी सुंदर करावे
येणाऱ्या अर्भकांसाठी

रूढीवर प्रहार, विज्ञाननिष्ठा, विवेकवादाचा पुरस्कार आणि प्रयत्नवादाचा प्रचार ही लोकनाथांच्या सामाजिक भूमिकेची कार्यत्रयी आहे. वक्तृत्व, लेखणी, वृत्तपत्रे, कविता, या सर्व साधनांचा उपयोग त्यांनी येथील प्रस्थापितांच्या व्यवस्थेच्या कर्मठपणावर व अंधश्रध्दावर हल्ला चढविण्यासाठी केला. लोकनाथाचे विचार विद्यमान स्थितीत चिरस्थायी आहे. आजच्या कालखंडातही सामाजिक विषमता व जातिभेद संपुष्टात आहे. असे म्हणण्याचे धाडस कोणी करणार नाही.

एकीकडे समाजात अंतर्गत जातिभेद आहेत आणि दुसरीकडे याचा गैरफायदा घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर या जातिभेदांना वांशिक रूप देण्याचा प्रयत्न काही मंडळी करीत आहे. यावर लोकनाथ कडाडून हल्ला करतात. त्यासाठी ही आव्हाने पेलण्यासाठी आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचे पुन्हा एकदा जागरण करणे आवश्यक आहे. दलित समाजातील सामाजिक सुधारणांचा इतिहास समजावून घ्यायचा असेल आणि येथील राष्ट्रवादाला अधिक बळकटी द्यायची असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या अध्ययनाला पर्याय नाही.

**निष्कर्ष :-**

लोकनाथ यशवंत हे समाजात वावरत असताना शहरात, गल्लीबोळांतून फिरताना तुमच्या-आमच्या प्रमाणेच त्यांची सुध्दा विचारचक्र फिरू लागलीत. छोट्या-छोट्या गोष्टीवर सामाजिक बाबींवर त्यांचे लक्ष केंद्रित झाले. दैनंदिन जीवनातील प्रश्नापासून अनेक गंभीर प्रश्नावर त्यांनी आपले लक्ष अधोरेखित केले. त्यांनी जे पाहालं, त्यांना जे जाणवलं ते त्यांनी कवितेच्या माध्यमातूनच वाचकांना सांगितलं, एरवी मग त्या साध्यासुध्या घटना सुध्दा असोत. त्यातूनच आधुनिक काळातील उल्लेखनीय कविता आकारास आल्यात. अनेक अडथळे आलेत तरी मानवी प्रयत्न जिंकतात याचा प्रत्यय देणाऱ्या कविता. लोकनाथ यशवंत यांच्यामुळे साहित्यविश्वाचे चित्र पालटले हे मात्र नक्की. याचे कारण असे की, कवितेत प्रतिबिंबित झालेले, सामान्य माणसांत दडलेले असामान्यत्व आणि कोणत्याही मध्यस्थाशिवाय किंवा निवेदकांशिवाय या सामान्य माणसांचा विचारप्रवाह थेट वाचकांपर्यंत पोहचविण्याची क्रांतीकारी शैली. प्रस्थापितांचे लेखननियम झुगारून लिहिलेले हे विचार लोकनाथांच्या मानसिक स्थितीचे वर्णन करतात. कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितासंग्रहामुळे

वाचकांवर होणाऱ्या परिणामांवरून त्याचे विश्लेषण कसे केले जाते, याचा वस्तुपाठही या निमित्ताने चर्चेला घेणे अगत्याचे ठरते. लोकनाथाची कविता ही काळ आणि संदर्भावर अवलंबून असलेली सापेक्ष संकल्पना आहे ती व्यक्तिगणिक बदलत जाते. लोकनाथाच्या कवितेचे मुल्यमापन करताना कवितेतील काही भाग विचारात न घेता संपूर्ण कविता समग्र कवितेचा विचार केला जावा. लोकनाथाची कविता नीतिमूल्यांचा उंबरठा ओलांडून स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेत श्वास घेणारी आहे. लोकनाथांनी कायम साहित्य त्याच्या प्रांतातील, साहित्यातील धार्मिक कट्टरता आणि कंपूशाहीचा कायम विरोध केला. कल्पनासागर बाजूला ठेवून, वास्तव वास्तवांची प्रेरणा, प्रेरणेचे वास्तव व वस्तुनिष्ठपणे वाचकांसमोर मांडले. लोकनाथांच्या कवितासंग्रहाच्या मुखपृष्ठावरील मुखवटे हे अनुभव, दु:ख, एकीकीपणा, असहायता, मूकपणा याचे दर्शन घडविणारे आहे. तऱ्हातऱ्हांचे माणसाचे मुखवटे असतात. ते घालून माणूस जीवनाच्या रंगभूमीवर येतो आणि त्याचं दर्शन आपल्याला मुखवट्यातून घडवितो. एक मुखवटा काढून टाकायचा, दुसरा मुखवटा काढून टाकायचा, तिसरा मुखवटा म्हणजेच तुमचे-आमचे नाना तऱ्हांचे अनुभव हे इथे लक्षात घ्या. शेवटी सगळे मुखवटे काढून टाकल्यावर आणखी एक मुखवटा काढून टाकण्याचा प्रयत्न माणूस करतो. परंतु तो माणसाचा खरा चेहराच असतो. चेहरा निघणार कसा? त्या प्रयत्नात माणूस थकतो, खाली पडतो आणि मरण पावतो. असे समाजात वावरणारे खोटे मुखवट्यांची, समाजाशी फसगत करून शेवटीकाय हालत होते याचे विदारक चित्रण कवितेतून व्यक्त केले आहे. मुखवट्याला चेहरा लावता येतो. परंतु डोळे लावता येत नाही. हे डोळे समाजाला असतात, समाज बघू शकाते. बघण्याची शक्ती समाजाजवळ असते.

## संदर्भ ग्रंथ


1) लोकनाथ यशवंत : 'पुन्हा चाल करू या...!', कवितासंग्रह यंग इंडिया पब्लिकेशन, मुंबई, प्र.आ. 1 जानेवारी 2009.

2) लोकनाथ यशवंत : 'बाकी सर्व ठीक आहे', कवितासंग्रह, समुद्र पब्लिकेशन्स्, नागपूर, प्र.आ. 31 डिसेंबर, 2014

3) प्रा. मेश्राम मेघमाला : 'यशवंत कविता लोकनाथची', अवेमारीया पब्लिकेशन, पुणे, प्र.आ. 13 मार्च 2013

4) प्रा. गायकवाड पुंडलिक : 'विवेक लेणी', पद्मपाणी प्रकाशन, नागपूर, प्र.आ. 25 डिसेंबर 2007.

5) डॉ. वानखडे कैलास : 'दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. 14 जानेवारी 2021

6) डॉ. किरवले कृष्णा : 'दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. 1991

7) डॉ. भवरे महेंद्र : 'मराठी दलित कवितेचा इतिहास' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. 01 नोव्हेंबर 2018

8) डॉ. लुलेकर प्रल्हाद : 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, साधन पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ. 2011

9) डॉ. इंगळे अशोक : 'समकालीन साहित्य मीमांसा', नवी रूपे, सुविधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. 26 नोव्हेंबर 2020

10) डॉ. शेंडे वसंत : 'आंबेडकरी साहित्यावर दिशा आणि दृष्टी', नभ प्रकाशन, अमरावती, प्र. आ., 20 मार्च 2014